

भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. १०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०२/२०१७

**१) संगनमत करुन जातीवाचक शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १०/०२/२०१७ चे ०९.३० दरम्यान. यातील फिर्यादीने आरोपी क्र. २ ला तुम्ही आपल्या बकऱ्या बांधुन ठेवत जा आमच्या झाडाची नुकसान करतात अशी बोलली असता यातील चारही आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचे घरी अनाधिकृतपने आत प्रवेश करुन फिर्यादीचे पतीला बाहेर ओढतान करुन फिर्यादी व फिर्यादीचे पतीला काठीने डोक्यावर मारुण जखमी केल्याने आरोपीतांना फिर्यादीची जात माहीत असुन सुध्दा आरोपीतांनी फिर्यादीस जातीवाचक शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी जखमीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५४,३२४,५०६,३४ भादंवी. सहकलम ३(१)(आर)(एस),३(२)(व्हीए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास श्री. संजय जोगदंड उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) संगनमत करुन बुक्कीने व काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. . :—**

दिनांक ०८/०२/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान. यातील दोनही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी भगवान महादेव कडूकार वय ५८ वर्ष रा. आमगाव दिघोरी यांचा मुलगा गोविंदा भगवान कडूकार वय २८ वर्ष, रा. आमगाव दिघोरी यास बुक्कीने व काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक ०९/०२/२०१७ चे २०.०० ते २१.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी एकनाथ नामदेवराव पडोळे वय ४८ वर्ष, रा. रविंद्रनाथ टागोर वार्ड पांढराबोडी रोड शुक्रवारी भंडारा यानी आपली हिरो होडा स्पेंन्डर काळया निळया रंगाची मोटार सायकल एमएच ३१ बि ई ८०४५ किंमती १८,०००/—रु. ची मोटार सायकल संभाजी लॉन समोर ठेवुन लग्न कार्यक्रमा करीता लॉनचे आत मध्ये जावुन व कार्यक्रम पार पडल्यावर बाहेर आले असता ठेवलेल्या ठिकाणी मोटार सायकल दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक १०/०२/२०१७ चे १८.३० ते १९.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी प्रवीन विनायकराव पुसदेकर वय ३४ वर्ष, रा. श्रध्दा पेठ खात रोड भंडारा याने हिरो होंन्डा स्प्लेंडर एनएक्सजी मोटार सायकल क्र एमएच २० बीबी ४८३८ किंमती २०,०००/—रु. मोटार सायकल आपल्या घराचे गेटच्या बाजुला ठेवुन घरामध्ये गेले व काही वेळानी घराबाहेर आले असता मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही इकडे तिकडे शोध घेतला असता मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) मुलीच्या गळयातील सोन्याचे ताबीज व चांदीची कोरीची चोरी . :—**

दिनांक १०/०२/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी सौ. उषा सापराम परशुरामकर वय ३१ वर्ष रा. खंडाळा ही आपल्या मुली सोबत सावरबांध येथे काल्याच्या कार्यक्रमाला हजर असतांनी यातील विधीसंघर्ष बालक याने फिर्यादीची लहान मुलगी ओमेश्वरी वय ४ वर्ष हिच्या गळयात असलेल्या काळया धागेत सोन्याचे ताबीज व चांदीची कोर अंदाजे किंमती २,०००/—रु. ची गळयातील धाग्याला झटका मारुन चोरी करुन नेतांना मिळुन आल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक १०/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, मोहाडी, कारधा, करडी, वरठी, तुमसर, आंधळगाव, गोबरवाही, लाखणी, पवनी, अडयाळ, दिघोरी व सिहोरा येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण १४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ८६ लिटर हातभट्टी दारु सडवा+साहित्य किंमती ३२,९२०/–रु. व २,३४० मिली लिटर ३५० मिली देशी दारु किंमती ६५० /–रु. तसेच जुगारातुन किंमती २३८ रु–/ असा एकुण किंमती ३३,८०८/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १०/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ९२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.